

# एक श्रुग(जाकीट) तयार करा

ह्या वीडियो मध्ये तुम्ही एक सुंदर डिज़ाइनर श्रग बनवायला शिकणार आहात.



श्रग बनविण्यासाठी तुम्हाला लागणार एक ८७ बाइ ६७ सेंटीमीटर चा कापड. तुम्ही तुमच्या आवडीचा कोणताही कापड वापरु शकतात.

त्यात लेस, फर किंवा सीक्वेन्स असु शकते. नेहमी प्रमाणे बीडीत पिन्स लागतील आणि सर्वात शेवटी तुम्हाला सजविण्यासाठी कपडाची फूल लागतील.

आता कापड उलटून त्याची उलटी बाजू समोर ठेवा, छोट्या बाजूने सुरूवात करा. पाव इंच जागा सोडून कपडाची काठ दोनदा दुमडा. असे करत असताना बीडीत पिन्स लावत जा आणि असे करत जा जोपर्यंत तुम्ही कपडाच्या उलट भागापर्यंत पोहोचत नाहीत.

दुसर्या बाजूने देखील याच प्रकारे कापड दुमडा. कपडाची दुसरी बाजू दूमडण्यासाठी पुन्हा तसेच करा. दुमडलेल्या कपडाला लांबी संपेपर्यंत पिना लावून टाका.

आता तयार कपडाला शिवण्यासाठी मशीन जवळ आणा आणि आतील दुमडलेली बाजू सुईबरोबर एक सरळ रेषेत येऊ द्या. याच पद्धतीने कपडाला संरेखित करा आणि शिवत असताना पिना काढायला विसरू नका.

उलट बाजूला सुद्धा हीच प्रक्रिया करा, प्रयत्न केला की शीलाई स्वच्छ आणि सरळ येत आहे.



आता कपडाची उलटी बाजू तुमच्या समोर टेबलावर सपाट ठेवा, शिवलेली काठ असे दुमडा जेणेकरून सर्व कोपरे मध्यभागी येऊन मिळतील. कोन ९० अंश असले पाहिजेत आणि कोपरे ही उत्तम प्रकारे जुळले पाहिजेत.

उलट बाजूला सुद्धा हीच प्रक्रिया करा. बाहेरील कोपराच्या टोकापासून सतरा सेंटीमीटर आत एक खूण करा. कपडाला सरळ बाजूने एकत्र उचला आणि त्याला उलट्या बाजूला फिरवा. असे केल्यानंतर धरा आणि पिनाने त्याला एकत्र लावून घ्या. उलट बाजूला पुन्हा हीच प्रक्रिया करा.



कपडाला मशीन जवळ घेऊन या, सतरा सेंटी मीटर च्या खुणापासून सपाट जागे पर्यंत शिवायला सुरूवात करा. पिनांच्या जवळ पोहोचताना त्यांना काढायला विसरू नका. शिवन लॉक आहे त्याची खात्री करा. असे दुसर्या बाजूला देखील परत करा. आता टेबलावर शिवलेले कापड ठेवा, तुम्हाला दिसेल की शेवट पासून दहा सेंटी मीटर पर्यंत शिवन केलेले आहे.

उरलेल्या उघड्या काठांना शिवण्यासाठी शिवलेल भागापासून सुरूवात करा. पण शीलाई उघडा आणि मग काठ पाव इंच आतून दोनदा दुमडा.



पिना लावून दुमडलेला भाग जोडा. असे कपड्याभोवती करत राहा जो पर्यंत तुम्ही दुमडलेल्या कपडाच्या सुरुवाती पर्यंत पोहोचत नाही. कपडाला मशीन वर ठेवा आणि त्याला प्रेसर फुट शी सरळ ठेवा. फुट खाली करा आणि शिवायला सुरूवात करा.

शेवटला पोहोचल्या वर शिवन लॉक करा. मशीन मधून कपडा काढा आणि आतून बाहेर करा. तुमचा श्रग सर्वांना दाखवायला तयार आहे.

तुम्हाला आधिक थोडी चमक वाढवायची असेल तर तुम्ही एक ब्रूचपण लावू शकतात. कपडे आणि रंगासोबत प्रयोग करा आणि तुमचेतल्या सर्जनशीळतेला वाव द्या. तुमच्या प्रियजनांना या मौल्यवान भेटवस्तू द्या.